Ease of Doing Business च्या अनुषंगाने "व्यवसाय परवाना" अंतर्गतच्या सेवांसाठी आवश्यक कागदपत्रे, फी, नियतकाल मर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी या बाबी लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसुचित करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## नगर विकास विभाग

**शासन निर्णय क्रमांक:- संकिर्ण-२०१५/प्र.क्र.३९८/नवि-२०**

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक:- २६ ऑगस्ट, २०१९

संदर्भ : १) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५

२) शासन निर्णय नगर विकास विभाग क्रमांक एम.सी.ओ-२०१५/प्र.क्र.१८९/ नवि-१४, दिनांक ०३.०६.२०१५.

३) शासन निर्णय संमक्रमांक दिनांक ०४.०९.२०१७.

**प्रस्तावना:-**

Ease of Doing Business च्या अनुषंगाने महत्त्वाच्या असलेल्या मालमत्ता कर, पाणीपट्टी, ना-हरकत प्रमाणपत्र व व्यवसाय परवाना या ४ घटकांतर्गतच्या सेवांसाठी आवश्यक कागदपत्रे, फी, नियतकाल मर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी इत्यादी बाबी लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत दिनांक ०४.०९.२०१७ च्या शासन निर्णयान्वये अधिसुचित करण्यात आल्या आहेत. तथापि सदर शासन निर्णयान्वये "व्यवसाय परवाना " अंतर्गतच्या सेवां विषयक बाबी या नगरपरिषदांसाठी अधिसुचित करण्यात आल्या नाहीत.

०२. **"व्यवसाय परवाना"** अंतर्गतच्या १० सेवांसाठी आवश्यक कागदपत्रे, फी, नियतकाल मर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी या बाबी दिनांक ०४.०९.२०१७ च्या शासन निर्णयान्वये महानगरपालिकासाठी अधिसुचित करण्यात आल्या असल्या तरी "अ","ब" व "क" वर्ग नगरपालिकांसाठी या बाबी अधिसुचित करण्यात आलेल्या नाहीत. महाराष्ट्र नगरपरिषदा / नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५, मधील कलम २८० नुसार **"व्यवसाय परवाना "** अंतर्गतच्या सेवा देखील नगरपरिषदा / नगरपंचायती कार्यक्षेत्रात देणे आवश्यक आहे.

**शासन निर्णय:-**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबी विचारात घेऊन Ease of Doing Business च्या अनुषंगाने दिनांक ०४.०९.२०१७ अन्वये मालमत्ता कर, पाणीपट्टी, ना-हरकत प्रमाणपत्र या सेवा ज्या प्रमाणे नगरपरिषदासाठी अधिसुचित करण्याचा निर्णय घेतला आहे, त्याप्रमाणे "व्यवसाय परवाना" अंतर्गतच्या १० सेवा देखील "अ","ब" व "क" वर्ग नगरपरिषदां / नगरपंचायती यांनी अधिसुचित करावयाच्या आहेत.

०२. शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्रामध्ये नमूद केलेल्या सेवा, आवश्यक कागदपत्रे व नियतकालावधी यामध्ये संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांना (नगरपरिषदा / नगरपंचायती) यांना बदल करता येणार नाही.

०३. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत सेवा पुरविण्याकरीता आकारावयाची फी निश्चित करण्याची संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांना मुभा राहील. तसेच संबंधित नागरी स्थानिक संस्थेची रचना विचारात घेऊन पद निर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी इत्यादी पदे संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांना सुधारणा करता येईल.

०४. राज्यातील सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा / नगरपंचायती यांनी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या कलम ३ नुसार सेवा अधिसुचित करणे व त्यांची अंमलबजावणी करणेबाबतची कार्यवाही करावी.

०५. उपरोक्त आदेशाची अंमलबजावणी तातडीने सुरु करण्याची जबाबदारी संबंधित मुख्याधिकारी, नगरपरिषदा / नगरपंचायती यांची राहील.

०६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०८२६१५२०३४८३२५ असा आहे. हा निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**( शंकर त्र्यं. जाधव )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**

**प्रत,**

१. मा. विरोधी पक्ष नेता, दोन्ही सभागृह, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
२. सर्व सन्माननीय विधानसभा/ विधानपरिषद व संसद सदस्य
३. मा. राज्यपाल महोदय यांचे सचिव
४. मा. मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव
५. सर्व मा. मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६. मा. राज्य निवडणूक आयोग यांचे कार्यालय
७. मा. मुख्य सचिव यांचे वरीष्ठ स्वीय सहायक
८. मा. आयुक्त, राज्य मुख्य सेवा हक्क आयोग
९. मा. लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय
१०. अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग

११. सर्व विभागीय आयुक्त
१२. सर्व जिल्हाधिकारी
१३. आयुक्त, सर्व महानगरपालिका
१४. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
१५. मुख्याधिकारी, नगरपरिषद /नगरपंचायत (सर्व)
१६. नगर विकास विभागातील सर्व कार्यासने
१७. निवडनस्ती.

**शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०१५/प्र.क्र.३९८/नवि-२०, दिनांक २६ ऑगस्ट, २०१९ चे सहपत्र.**

**"व्यवसाय परवाना"**

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम- २०१५**

**(कलम - ३ अन्वये नगरपालिकांनी जाहिर करावयाचा लोकसेवेचा तपशिल**

**"अ" वर्ग नगरपरिषदा**

| अ.क्र | लोकसेवांची सूची | आवश्यक कागदपत्र | फी | नियत कालमर्यादा | संबंधित अधिकारी | प्रथम अपिलीय प्राधिकारी | द्वितीय अपिलीय प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | नवीन परवाना मिळणे | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कार्यालयीन अधिक्षक | अतिरिक्त मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २) | परवान्याचे नुतणीकरण | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कार्यालयीन अधिक्षक | अतिरिक्त मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३) | परवाना हस्तांतरण | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कार्यालयीन अधिक्षक | अतिरिक्त मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ४) | परवाना दुय्यम प्रत | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कार्यालयीन अधिक्षक | अतिरिक्त मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ५) | व्यवसायाचे नाव बदलणे | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कार्यालयीन अधिक्षक | अतिरिक्त मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ६) | व्यवसाय बदलणे | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कार्यालयीन अधिक्षक | अतिरिक्त मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ७) | परवाना/ धारक भागीदाराचे नाव बदलणे | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कार्यालयीन अधिक्षक | अतिरिक्त मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ८) | भागीदाराच्या संख्येत बदल (वाढ/कमी) | योग्य प्रकारे भरलेले अर्ज | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कार्यालयीन अधिक्षक | अतिरिक्त मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ९) | परवाना रद्द करणे | योग्य प्रकारे भरलेले अर्ज | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कार्यालयीन अधिक्षक | अतिरिक्त मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| १०) | कालबाह्य परवानासाठी नुतणीकरण सूचना | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कार्यालयीन अधिक्षक | अतिरिक्त मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |

**शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०१५/प्र.क्र.३९८/नवि-२०, दिनांक २६ ऑगस्ट, २०१९ चे सहपत्र.**

**"व्यवसाय परवाना"**

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम- २०१५**

**(कलम - ३ अन्वये नगरपालिकांनी जाहिर करावयाचा लोकसेवेचा तपशिल**

**"ब" वर्ग नगरपरिषदा**

| अ.क्र | लोकसेवांची सूची | आवश्यक कागदपत्र | फी | नियत कालमर्यादा | संबंधित अधिकारी | प्रथम अपिलीय प्राधिकारी | द्वितीय अपिलीय प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | नवीन परवाना मिळणे | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कार्यालयीन अधिक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २) | परवान्याचे नुतणीकरण | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कार्यालयीन अधिक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३) | परवाना हस्तांतरण | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कार्यालयीन अधिक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ४) | परवाना दुय्यम प्रत | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कार्यालयीन अधिक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ५) | व्यवसायाचे नाव बदलणे | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कार्यालयीन अधिक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ६) | व्यवसाय बदलणे | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कार्यालयीन अधिक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ७) | परवाना/ धारक भागीदाराचे नाव बदलणे | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कार्यालयीन अधिक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ८) | भागीदाराच्या संख्येत बदल (वाढ/कमी) | योग्य प्रकारे भरलेले अर्ज | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कार्यालयीन अधिक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ९) | परवाना रद्द करणे | योग्य प्रकारे भरलेले अर्ज | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कार्यालयीन अधिक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| १०) | कालबाह्य परवानासाठी नुतणीकरण सूचना | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कार्यालयीन अधिक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |

**शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०१५/प्र.क्र.३९८/नवि-२०, दिनांक २६ ऑगस्ट, २०१९ चे सहपत्र.**

**"व्यवसाय परवाना"**

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम- २०१५**

**(कलम - ३ अन्वये नगरपालिकांनी जाहिर करावयाचा लोकसेवेचा तपशिल**

**"क" वर्ग नगरपरिषदा/ नगरपंचायती**

| अ. क्र | लोकसेवांची सूची | आवश्यक कागदपत्र | फी | नियत कालमर्यादा | संबंधित अधिकारी | प्रथम अपिलीय प्राधिकारी | द्वितीय अपिलीय प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | नवीन परवाना मिळणे | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | वरिष्ठ लिपीक | कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| २) | परवान्याचे नुतणीकरण | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | वरिष्ठ लिपीक | कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ३) | परवाना हस्तांतरण | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | वरिष्ठ लिपीक | कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ४) | परवाना दुय्यम प्रत | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | वरिष्ठ लिपीक | कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ५) | व्यवसायाचे नाव बदलणे | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | वरिष्ठ लिपीक | कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ६) | व्यवसाय बदलणे | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | वरिष्ठ लिपीक | कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ७) | परवाना/ धारक भागीदाराचे नाव बदलणे | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | वरिष्ठ लिपीक | कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ८) | भागीदाराच्या संख्येत बदल (वाढ/कमी) | योग्य प्रकारे भरलेले अर्ज | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | वरिष्ठ लिपीक | कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ९) | परवाना रद्द करणे | योग्य प्रकारे भरलेले अर्ज | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | वरिष्ठ लिपीक | कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| १०) | कालबाह्य परवानासाठी नुतणीकरण सूचना | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | वरिष्ठ लिपीक | कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |